# यवतमाळचा सांस्कृतीक वारसा आणि कासलीकर घराणे.

**डॉ. स्मिता प्रभाकर देशमुख**
एम. ए. भारतीय संगीत पी. एच. डी.

**प्रस्तावना :—**

यवतमाळ शहर हे जसे विदयेचे माहेरघर म्हणून प्रसिध्द आहे तसेच सांस्कृतिक ऐतीहासिक शहर म्हणुनही प्रसिध्द आहे. यवतमाळला व—हाडच पुणे म्हणतात विदर्भ हा शब्द खुपच प्रकाशीत झाला आहे. हे दोन्ही शब्द एकाच भुगोलाचे आहे. यवतमाळच्या भौगोलीक इतिहास बघता प्रसिध्द इतिहासहार प्र. रा. देशमूख यांची माहिती नुसार या गावचे मुळ नाव ''योतमाड'' अस होत. या नावाला अर्थ आहे. योत म्हणजे जवळ असलेली वस्ती, म्हाड म्हणजे उंच वृक्ष राजी काही लोक सांगतात कि, पुर्वी एक खेड होत. त्याच नाव येवती पुढे कालांतराने झाल यवते आणि माळावरचे यवते म्हणून लोक म्हणून लागले. यवतमाळ या कथानकास पृष्ठी मिळते. १८८०—९० च्या सुमारास केसरी प्रबोध या पत्रिके हा उल्लेख मिळतो.

नैतिक, बौध्दीक, सौंदर्यात्मक, मानसीक, भाारिरीक या सर्व बाजूने विकसीत झालेल्या यवतमाळ शहराला मिळालेला सांस्कृतिक वारसा पुढे संगीत क्षेत्राला अपुर्व असल्याची साक्ष होय. एकाच वेळी सनातनी व सुधारक शिस्तशिर व कलंदर अशी दुहेरी रूपे असणारी यवतमाळ शहर संगीताच्या बाबतीतही स्वत:ची अशी विशेष प्रतीमा राखून यवतमाळकर कला प्रस्तुती, कला विचारांचा व रसिकतेचा स्वताचा ठसा आहे. स्वैर कलाकारी पेक्षा इथले कलाकार एक जबाबदार संगीत साधक आहे. यवतमाळ करांनी संगीत विश्वाला क्षेत्रात अनेक रसिले गायकीची रत्ने, संगीत करांचे माणीक मोती व शास्त्रकारांची हिरे दिले आहे.

**विषय दृष्टीने अध्ययन :—**

मनुष्य स्वत:च्या सुखासाठी भौतीक साधने प्राप्त करतो, ती प्राप्ती निसर्ग नियमानुसार त्याचा विकास होतो. ती उन्नती, उत्क्रांती आणि प्राप्त झालेल्या सुखना त्या आनंदात दुस—याला देण्याची इच्छा म्हणजे संस्कृती ही गोविंदराव टेबेंनी संस्कृतीची व्याख्या केली. एकाच देशातील प्रत्येक प्रांताची ही वेगवेगळी असते. तेथील इतिहास कला, रितीरिवाज इत्यादी लोक प्रकृतीच्या मिलापातून बनलेले असते. तिचे निरनिराळे वैशिष्ट असते. निरनिराळया देशातील निरनिराळया पध्दती तसेच देशातील प्रांताची वेगवेगळी वैशिष्ठे असतात. प्रत्येक प्रांताची भाषा, राहणीमान, खानपान, सांस्कृतीक मूल्ये हि निरनिराळी आहे. कारण भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. सांस्कृतीमक विकासाचे अनेक टप्पे आहेत. संगीत क्षेत्रातील सांगीतिक भाषा हा सांस्कृतीक विकासातील महत्वाचा टप्पा आहे. संगीतात स्वर हेच साधन घेवून आकृती तयार होते. जसे चित्रकलेमध्ये रंगांनी, शिल्पकलेत धातुने, दगडाने त्याप्रमाणे संगीत कला सुरांनी आकृतीबंध होते.

यवतमाळच संस्कृतीत संगीताला आकारबध्द करण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. यवतमाळ भाहर हे शिक्षणा ज्ञानोपासना वैचारिक, सामाजिक व राजकीय चळवळीचे केंद्र आहे. व्यापार उदयोगामुळे येणारी समृध्दी व सुबकत्ता यवतमाळच्या वाटयाला आलेली आहे. तरीही संगीतकला साहित्य, नाटयशिक्षण क्षेत्रासाठीचे अध्ययपूर्ण यवतमाळने आजवर समर्थपणे सांभाळले आहे. यवतमाळला लक्ष्मीपेक्षा सरस्वतीच्या वरदहस्त आहे. असे म्हणने उचित ठरेल. इथल्या रसिकांना प्रामूख्याने सुरेल लयतालाशी सुसंवाद साधनारे सुबध्द बांधनी असणारे काहीसे बुध्दीप्रधान पण दिखाऊ चमत्कृती नसलेले प्रामाणीकपणे पेश केलेले पक्के गाणे आवडते. वादनाचा आनंद तुलनेने कमी घेतला जातो तर नृत्यासाठीचा ख—या अर्थाने जानकर प्रेक्षकवर्ग अजूनही तुलनेने कमी आहे. असे दिसते यवतमाळात अनेक कलाकार जन्मले, वाढले, बहरले यवतमाळ बाहेरच्याही अनेक गुणी कलाकार यतवमाळ रसीकांनी वारवाणले व आपलेसे केले व त्यांना उच्च शिखरावर नेवून ठेवले. त्यामध्ये गायक कलाकार उल्लास कशाळकर, पं. मनोहर कासलीकार, पुरूशोत्तम कासलिकर, डी. व्ही. पणके, जाधव बुवा, भोखर सरोदे, प्रसाद खापर्डे, अवीराज तायडे, साधना मोहिते, रंजन पातूरकर, राजेंद्र देशमूख, विकास कशाळकर, अरूण कशाळकर इत्यादी.

यवतमाळच्या इतिहासात डोकावून बघतांना इथे वारकरी नारदीय कीर्तन परंपरा होती असे दिसते. सामान्य जनांच्या घराघरात अबाल वृध्दांच्या ओठी नांदणारी पारंपारीक पदे, ओव्या, अभंग, आरत्या, भुपाळया, स्तोत्रे, स्त्रीगीते असे संस्कृत, प्राकृत प्रबंधच रूढ होते. वारकरी संप्रदाय, नाटय परंपरा, नृत्य

परंपरा, भजन परंपरा, गायन शाळा परंपरा, साहित्यीक परंपरा, राजकीय परंपरा इत्यादी क्षेत्रात अग्रेसर तत्कालीन काळात होते.

यवतमाळला वारकरी लोकांचा प्रभाव कमी असल्याने भजनी मंडळी, दिंडया, विराण्या झाल्या नाहीत. भजनात सुप्त संगीत असत. शास्त्रोक्त संगीताची कास धरत असतात. मग अशा वातावरणात संगीताची सेवा घडते. किंवा संगीताकडे लोक ओढले जातात. यवतमाळचे परिचीत आणि कीर्तन क्षेत्रात आपला ठसा उमटणारे बोबडे बुवा किवा नागपूरचे शामसुंदर बुवा, भुजाडे शंकरराव वाघोलीकर, शामराव भाट अशी जर मंडळी सुरूवातीच्या काळात यवतमाळला लाभली असती तरी यवतमाळला संगीताचा सुर गवसला असता. लय सापडली पण तसे घडले नाही. यवतमाळला याच १९२५ दरम्यान कृष्णराव जाधव आले. त्यांनी 'सरस्वती संगीत विदयालय' काढले. संगीत जीवनात आवश्यक आहे, जीवनोपयोगी आहे. मनावर सुक्ष्म संस्कार करणारे आहे. याची समज सामान्य लोकांमध्ये अभावानेच होती. अशा वातावरणात संगीताचा प्रसार आणि शिक्षण देणे जाधवबुवांना किती जड गेले असेल यांचा अंदाज करणे अवघड आहे. जाधवबुवा शिक्षक नव्हते तर ते बुवा होते. शिक्षण क्षेत्राची जाण असणा—यांना बुवा या संज्ञेचा अर्थ विशद करायला नको. बुवा इचलकरंजीकडून आले होते. तिकडे कारंजा गाव आहे. जाधव बुवा प्राथमीक शाळेत जायचे. कवीता चालीवर म्हणून घ्यायचे त्यानंतर हा प्रयोग वसंत देसाई दिग्दर्शक यांनी केलेला आढळतो. त्यानंतर सालोडकर हे जाधव बुवांचे शिष्य यांनी ही परंपरा चालवीली.

तसे पं. कासलीकरांचे जन्म स्थान 'बेला' आहे. यवतमाळचे नाव संपूर्ण संगीत क्षेत्रात गाजवीणारे 'कासलीकर कुटूंब' बाबाराव कासलीकर दारव्हाच्या बाजूने १९३० च्या सुमाराम आले. ते बडोदयाहून गाणं शिकूण आलेत. खॉ साहेब मौलबक्ष यांच्या बडोदा घराण्याचे गायक त्यांची पुढची पीढी म्हणजे त्यांची मुले बाबुराव — मनोहर — पुरूषोत्तम, बाबाराव कासलीकर हे उत्तम हार्मोनियम वादक होते. त्यांनी अनेक संगीत चाहत्यांना संगीत शिक्षण घरोघरी जावून दिले व शास्त्रीय संगीताची अभिरूची वाढवली. ते १९३७ च्या सुमारास कालवश झाले. या नंतर जाधव गुरूजींचे शिष्य श्री. सालोडकर गाण्याच्या क्षेत्रात स्थिरपद होण्याच्या प्रयत्नात होते पण हा काळ गाण्याला अनुकुलच नव्हता हा विभाग किती दुर्लेक्षीत होता

या नंतरचा प्रयत्न नगरपालिकेद्वारे सुरू झालेल्या संगीत विदयालयाचा हा पुढाकार पालिकेचे त्या वेळचे उपाध्यक्ष श्री. वि. रा. श्री.खंडे यांनी घेतला विदयार्थ्यांची सोय झाली. श्री. पुरूषोत्तम कासलीकर, डी. व्ही. पणके, चेपे गुरूजी, दादा पांडे, प्रभाकर देशपांडे यांनी त्यानंतर श्री. गलांडे यांनी विदयालयाचा विस्तार केला.

यवतमाळ येथे संगीत मैफीलीच्या आयोजनाच्या संस्था स्थापन झाल्यात. नगर वाचनालय यवतमाळ या ठिकाणी संगीत कलोपासक मंडळाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर कलाश्रय नावाची संस्था कार्यरत होती. भारतातील अनेक दिगग्ज कलाकारांचे गायन संपन्न झाले. गायक कलाकार प्रकाश संगीत उल्लास कशाळकर, आप्पा जळगांवकर, श्रीकांत देशपांडे, सुधाकर जोशी, प्रभाकर कारेकर, कुमार गंधर्व, प्रभा अत्रे, किशोरी अमोनकर इत्यादी कलाकारांनी हजेरी लावली. डॉ. उमरडेकर, डॉ. राजेंद्र देशमुख, श्री. गुणवंत ठाकरे, नानासाहेब इंगळे यांनी ही मंडळी अस्थित्वात आणली. तद्नंतरच्या काळात यवतमाळ येथील दर्डा परिवारातर्फे अनेक गायक कलाकार यांच्या मैफीली आयोजीत करण्यात आल्या. त्यामध्ये पंडीत जसराज — रशीद खॉ, अहमद हुसेन, शुभा मुद्गल, चौरसीया उस्ताद झाकीर खॉ इत्यादी नामवंत कलाकारांनी हजेरी लावली. १९७८ च्या सुमारास तीन दिवसांची संगीत परिशद आयोजीत करण्यात आली. त्यामध्ये डॉ. वसंतराव देशपांडे, कुमार गंधर्व यांचे गायन अतिशय भारदस्त झाले अशी नोंद आहे.

तत्कालीन काळात पारवा येथील पारवेकर घराण्याच्या गणेश महोत्सवात हिराबाई बडोदेकर, प्रभा अत्रे, किशोरी अमोनकर यांनीही हजेरी लावली. तर स्व. बाबाराव कासलीकर यांच्या स्मृतीपित्यर्थ होत असलेल्या महोत्सवात राम मराठे, छोटा गंधर्व सुरेश हळदनकर इत्यादी कलाकारांचे सतत कार्यक्रम होत असे. यवतमाळचे एकूण उत्सवी स्वरूप बघता रागदारी संगीताच्या संदर्भात अनेक कलाकार येवूनही भूमी पावन झालेली आहे.

नाटयक्षेत्रात बाल गंधर्वाची अनेक नाटके या ठिकाणी झालेली आहे. ते सतत यवतमाळला डेरा लावून रहायचे. या वस्तीत रसिकांच्या श्रवण अनुभवाचा स्तर विस्तारीत आहे असे म्हणता येईल. त्या काळात ॲड. दामले, भाऊसाहेब पाटणकर, श्री. बाबासाहेब घारफळकर, हरिभाऊ केसकर, ॲड. भालचंद्र पेशीबाबा, खुशालराव मानकर, नागरमाल नेमाणी, उमरेउकर, नानासाहेब इंगळे, एकबोटे इत्यादी मंडळींने सतत परिश्रम घेतले. राजापूरकर संगीत मंडळीचे मालक श्री. बाबाजी दौलतराव राणे होते. त्यांचे संत तुकाराम नाटक प्रसिध्द होत. याच नाटक कंपनीत बाल गंधर्व यांची नाटके होत असत. एकलारेकर देशपांडे, पारवेकर यांचा वाडा टिळक स्मारक, टाऊन हॉल या ठिकाणी मैफील आयोजीत करण्यात येत असे. अशा मेळयामधून त्या वेळच्या अनेक कलाकारांच्या कला शिक्षणाचा पाया घातलाव गेला. अनेक कलाकार घडले. उतरार्धात राजेंद्र

देशमुख, प्रसाद खापर्डे, साधना मोहिते या कलाकारांनी आकाशवाणीची ''अ'' श्रेणी प्राप्त केली व शास्त्रीय गायनात भर टाकली.

फिल्म संगीत क्षेत्रात अनेक समूह तयार झाले. त्यामध्ये श्री. अविनाश जोशी, अविनाश नाठार, सुधाकार कदम सर्वेप्रथम ऑर्केष्ट्रा सुरू केला. त्यांनीही धुरा नटराज संगीत ॲकडेमीची संचालक बाबा चौधरी, किशोर सोनटक्के यांनी अनेक चित्रपटांना दर्जेदार संगीत देवून आपली वेगळी छटा निर्माण केली. भाई जांबुतराव धोटे यांनी 'जागो' सिनेमा तयार केला तर जोगळेकर यांनी अनेक चित्रपटांना दिग्दर्शन केले.

साहित्य क्षेत्रात शरदचंद्र टोंगो, भाऊसाहेब पाटणकर – शरद कळणावत, शंकर बडे इत्यादी साहित्य करांनी तर जवाहरलाल दर्डा, पारवेकर, नाईक घरान्यांनी सांस्कृतीक वारसा सतत तेजोमय केला.

महाविदयालयीन स्तरावर अमोलकचंद महाविदयालय, अणे महाविदयालय, दो महाविदयालय संगीत विषय सुरू करून अनेक विदयार्थ्यांना संगीताचे शिक्षण घेतले. यावरून रसिकांच्या श्रवण अनुभवाचा पट विस्तारीत आहे. असे म्हणता येईल व पुढील काळात श्री. श्री. संगीत विदयालय उषा मोर परिवाराने सुरू केले व संगीताची सातत्याने सेवा करीत आहे.

सध्या कॉर्पोरेट शोज च्या जमान्यात मैफीलीचे रंगरूप पालटले दिसते. आता त्यात नव्या युगधर्मानुसार सारे काही आखीव रेखी नेत्रदिपक पण तितकेच अल्पजीवी व ढोबळ झालेले दिसते. एखादया गोष्टीची संख्यात्मकता वाढली की गुणात्मकता कमी होते हे तत्व इथे लागू होते.

मौलाबख्श घराणे बडोदा

पहेलवानीच्या आखाडयातुन संगीत क्षेत्राच्या आखाडयात शिरलेले आणि गायन, वीणावादन व स्वरलेखनातील आखाडयात जीवनार्पण केलेले खॉ मौलाबख्श एक अद्वितीय कलारत्न होऊन गेलेत. मौलाबख्शांचा जन्म भिवानीच्या एक मोठया जागीरदार कुटूंबात सन १८३३ मध्ये झाला. पुढे त्यांना बडोदा संस्थानात सयाजीराव महाराजांनी आश्रय दिला. मानमरातब केला महाराजांच्या इच्छेनुसार बडोदा येथे संगीत विदयालय स्थापन करण्यात आले तिथेच मौलाबख्शांची अध्यापक म्हणुन नियुक्ती करण्यात आली. मौलाबख्श यांना ''भारतीय संगीताचे प्रोफेसर'' ही बहुमान्य पदवी १८५७ साली तत्कालीन इंग्रजी शासनाचे गवर्नर जनरलच्या हस्ते प्रदान करण्यात आली होती. महाराजांबरोबर मौलाबख्श विदेशांत दौरा करून आले. तिथे त्यांनी बॅन्डच्या वादन व लेख पध्दतीचा अभ्यास केला. भारतात स्वरलिपीचा सर्वपथम पुरस्कार करण्याचा मान मौलाबख्शांनी प्राप्त केला. त्यांनी अनेक रचना केल्या ''छंदोमंजरी'' नावाचे पुस्तक लिहीले. त्या काळात व–हाडात त्यांची ये जा होती त्यामुळे त्यांची शिष्य शाखा निर्माण झाली. त्यांनी अनेक विदयार्थ्यांना मार्गदर्शन दिले. त्यांच्या शिष्यांमध्ये गणपतरावजी बर्वे (मास्टर मनहरजींचे वडील), विदर्भातील नामदेवबुवा अमरावतकर, बाबाराव कासलीकर उल्लेखनीय होत. बडोदा विभागात मौलाबख्शांनी मोलाची संगीत कार्य केले आणि १० जुलै १८९६ रोजी तिथेच ते पैगंबरवासी झाले.

**निष्कर्ष :–**

मुळात यवतमाळ शहराचा सांस्कृतिक वारसा वाखाणण्यासारखा त्यात मौलाबख्श सारखे विद्वान तेथे जावून विदयादान करतात, त्यामुळे संगीत क्षेत्रात प्रगती होऊन त्यास सौंदर्याची झालर लागली. आणि अनेक गायक, कलाकार तयार झाले असे मला वाटते.

विदर्भात नथ्थुबुवा उमरावतकर, केशवराव कवीश्वर, बाबाराव कासलीकर, गणपतरावजी बर्वे, नामदेवबुवा उमरावतकर यांनी मौलाबख्श घराण्याचा प्रचार प्रसार केला व नंतरच्या काळात पं. मनोहर कासलीकर यांचे मौलाबख्श घराण्याचे गायक म्हणुन ख्याती होती.

**संदर्भ सुची ग्रंथ**

१) संगीत शास्त्र विजयिनी – डॉ. नारायण मंगरूळकर
२) शतकातील यवतमाळ – अरूण हळबे
३) संगीत कलाविहार